**कलम १०७ मधील तरतूद**

१. जेव्हा एखाद्या कार्यकारी दंडाधिकारी यांना अशी खबर मिळेल की, कोणताही इसम शांतता भंग करील असा संभव आहे,अगर त्याच्या ज्या कृत्यामुळे मुख्यत्वे करुन शांतता भंग होण्याचा संभव आहे, अशी खात्री झाल्यास एक वर्षापेक्षा जास्त नाही इतक्या मुदतीसाठी त्याने शांतता राखण्याब ाबत हमीशिवाय अगर हमीदारासह जात मुचलका लिहून घेण्याबाबत हुकूम का करु नये याचे कारण दाखविण्यास या कायद्यात पुढे सांगितल्याप्रमाणे फर्माविण्याचा कार्यकारी दंडाधिकारी यांना अधिकार ी आहे.

२. ज्या ठिकाणी शांततेचा भंग किंवा दंगा होण्याची भीती असेल ती जागा कोणत्याही क ार्यकारी दंडाधिका-याच्या स्थानिक अधिकार क्षेत्रात किंवा अशा अधिकार क्षेत्रात जो इसम शांततेचा भंग करण्याचा किंवा सार्वजनिक शांततेचा भंग करील असा संभव असेल किंवा अशा अधिकार क्षेत्राबाहेर वर सांगितल्याप्रमाणे कोणतेही अन्यायाचे कृत्य करील असा संभव असेल तेव्हा या कलमा खालील

काम चालविण्याचा अधिकार कोणत्याही कार्यकारी दंडाधिकारी यांना आहे. जेथे शांततेचा भंग होण्याची शक्यता आहे किंवा जो शांततेचा भंग करण्याची शक्यता राहतो तेथील कार्यकारी दंडाधिकारी या कलमाखाली कारवाई करु शकतो.

**चॅप्टर केस चालविण्याचे कामी सूचना व कार्यपध्दती**

१. या कलमान्वये कृत्ये गुन्हा ठरत नाहीत सबब चॅप्टर केस मधील सामनेवाला यास आरोपी संबोधण्यात येऊ नये.

२. या कलमाचा उद्देश शिक्षात्मक नसून केवळ प्रतिबंधात्मक आहे. पुढील काळात ज्यायो गे शांतता भंग होईल अशा कोणत्यही कृत्यास आडकाठी असावी असा या कलमाचा उद्देश आहे. जेव्हा प्रत्यक्ष गुन्हा घडला असेल तर इंडियन पिनल कोडच्या कलमान्वये खटला दाखल करणेत यावा.

३. ३. कलम १०७(२) अन्वये धार्मिक मिरवणूका समारंभ जमाव निवडणूका किंवा कोणतीही राजकीय चळवळ अशा स्वरुपाच्या प्रसंगी शांततेत बिघाड होण्याचा किंवा सार्वजनिक शांतता भंग होणे असे सकारण वाटत असेल त्या प्रसंगी या कलमान्वये प्रतिबंधक उपाय योजना परिणामकारक ठरेल.या कलमान्वये चॅप्टर केस दाखल करताना पोलीस ब-याच वेळा सामनेवाला/सामनेवाले यांना कलम १५१(१) अन्वये पकडून आणून हजर करतात त्याच वेळी चॅप्टर प्रकरणाची कागदपत्रेही हजर करतात. तथापि याकामी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, चॅप्टर केसमध्ये कागदपत्रे हजर करतांना सामनेवाला याला पकडून हजर

करण्याची कायद्यात कुठेही तरतूद नाही. जर पोलीसांनी कलम १५१(१) अन्वये, एखाद्या व्यक्तीच्या हातून दखलपात्र गुन्हा घडण्याची शक्यता असेल तर अशा व्यक्तीला सोडून देण्याचा अधिकार कार्यकारी दंडाधिकारी यांना नाहीत. तर अशा इसमास पोलीसांनी कलम ५६ प्रमाणे ज्यांना केस चालविण्याच ा अधिकार आहे अशा दंडाधिका-यांकडे शक्य तितक्या लवकर हजर करणेचा आहे. अशा इसमाचा जामीन घेणेचा अगर त्यास रिमांड देणेचा अधिकार कार्यकारी दंडाधिकारी यांना नाही हे लक्षात ठेवावे. एखादी व्यक्ती शांततेचा भंग करणार आहे अगर सार्वजनिक शांततेस बाधा येईल असे काय करणार आहे म्हणून त्याला

१५१ (१) खाली वारंटाशिवाय अटक करणेचा पोलीस अधिकारी यांना अधिकार नाही, असा निर्णय अलहाबाद हायकोर्टाने दिला आहे. प्रस्ताव

प्राप्त झाल्यावर सामनेवाल्या विरुध्द कारवाई करणेचे ठरलेवर खालील बाबी नमूद करावयास हव्यात.

१. मिळालेल्या माहितीचा मतितार्थ

२. घ्यावयाचे बॉन्डची रक्कम

३. बॉन्डची मुदत

४. जामिन किती,कोणते प्रकारचे व कोणते वर्गाचे घ्यावयाचे याबाबत आदेशांत उल्लेख असावा असा आदेश प्रिंटेड/सायक्लोस्टाईल नसावा. कारण तो प्रत्येक प्रकरणांत वेगळा असेल.तसेच प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कलम १११ अन्वये आदेश काढला पाहिजे. असा आदेश त्वरीत काढून सामनेवाला याला सुनावणीची संधी देणेत यावी. सामनेवाल्यास देणेचे नोटीसी बरोबर या आदेशाची प्रत द्यावी.

२ या केसेसमध्ये पुराव्याचा प्रकार खालील मुद्दांवर असावा.

१. भांडणाचे अस्तित्व असण्याचे कारण व त्याची कालमर्यादा

२. अशा कारणास्तव दोन पक्षातील दुरावलेले पूर्वीचे व सध्याचे संबंध

३. एकमेकांविरुध्द दिलेले कॉग्नीझेबल व नॉन कॉग्नीझेबल गुन्हयाचे काम कोणत्याकोर्टात चालू आहे का

४. प्रत्येक पक्षाचे लोक व त्यांची एकमेकांकडे पहाण्याची प्रवृत्ती.

५. शांतता भंग होण्याचे अपेक्षित प्रसंगया कलमाखाली सामनेवाल्यास कोर्टात हजर राहणेबाबत जामिन देणेचा अगर जेलमध्ये ठेवणेचा आदेश देता येत नाही. मात्र ११६(३) कलमाखाली अंतरिम बॉन्ड देणेचा आदेश देऊन तसा बॉन्ड न दिल्यास जेलमध्ये ठेवता येईल.

कलम ११२ नुसार कलम १११ खाली केलेला हुकूम सामनेवाला यास तो कोर्टात हजरअसल्यास वाचून दाखविला पाहिजे अगर त्यांचा सारांश त्यास समजावून सांगितला पाहिजे.

कलम ११३ नुसार सदरहू इसम कोर्टात हजर नसेल तर त्यास नमुना १४ मध्ये समन्सकाढावे.

कलम ११६(३) नुसार एखाद्या इसमाकडून शांतता भंग होण्याचा संभव असल्याची कार्यकारी दंडाधिकारी यांची खात्री झाल्यास असशा इसमास कलम १११ अन्वये आदेश काढलेवर व तो बजावलेवर चॅप्टर केस निकाली होईपर्यंत इंटेरिम बॉन्ड घेण्याचा अधिकार कार्यकारी दंडाधिकारी यांना आहे. व जो पर्यंत असा इंटेरियन बॉन्ड समानेवाला देत नाही (वैयक्तिक अगर हमीदारासह) तो पर्यंत त्याला रखवा लीत अडकवून ठेवण्याचा
अधिकार कार्यकारी दंडाधिकारी यांना आहे. अशा आदेशाची कारणे सविस्तरपणे आदेशात नमूद करावीत. अशा आदेशास हमीपत्र किती रकमेचे व कोणते प्रकारचे इसमांकडून द्यावे त्याचाही उल्लेख असावा.

**कलम १०८**

राजद्रोहात्मक मजकूराचा प्रसार करणा-या इसमाकडून चांगल्या वर्तणुकीबाबत तारण

१. जेव्हा कार्यकारी दंडाधिकारी यांना अशी खबर मिळेल की, त्याच्या स्थानिक अधिकार क्षेत्रात जो कोणताही इसम त्या क्षेत्रामध्ये किंवा बाहेर(एक) तोंडी किंवा लेखी किंवा इतर कोणत्याही रितीने, खालील बाबतीत जाणून बुजून प्रसार करीत आहे किंवा
प्रसार करण्याचा प्रयत्न करीत आहे त्याकामी कोणत्याही रितीने साह्य करीत आहे.अ) कोणताही राजद्रोहात्मक मजकूर की जो प्रसध्दि करणे भारतीय दंड संहितेच्या कलम १२४-अ किंवा १५३-अ किंवा १५३-ब किंवा २५९-अ अन्वये शिक्षेस पात्र आहे असा मजकूर किंवाब)कोणताही न्यायाधिश आपले सरकारी कर्तव्य बजावित

असतांना किंवा बजाविण्‍ ााचा प्रयत्न करताना त्यास उद्देशून लिहिलेला जो मजकूर भारतीय दंड संहितेन्वये अन्यायाची धमकी देण्यादाखल किंवा बदनामीकारक होईल असा मजकूर..

२. भा.दं.सं. कलम २९२ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही बिभत्स वस्तू करील,बनवील,विक्रीस ठेवी ल, आयात करीत, निर्यात करील, भाडयाने दिली जाईल,वाटली जाइ्रल, सार्वजनिकरित्या प्रदर्शित केली जाईल किंवा कोणत्याही प्रकारे फैलावली जाईल..तेव्हा एका वर्षाहून जास्त नाही इतक्या मुदतीसाठी कार्यका री दंडाधिकारी चांगली वर्तणूक ठेवण्यासाठी त्याचेकडून वैयक्तिक अगर हमीदा रासह मुचलका घेण्याबाबत हुकूम क ा करु नये याचे कारण दाखविण्यासाठी त्या इसमास पुढे सांगितल्या प्रमाणे फर्माविण्याचा अधिक ार कार्यकारी दंडाधिकारी यांना आहे. तसेच सदर काम पुढे चालविण्यास पुरेसे कारण असेल तर त्याबाबतही त्यांना अधिकार आहे.
२. छापखान्याबाबत आणि पुस्तके नोंदण्याबाबत अधिनियम १८६७ यात ठरविलेल्य ा नियमान्वये नोंदलेल्या,संपादिलेल्या, छापलेल्या व प्रसिध्द केलेल्या लेख्यातील कोणत्याही मजकुरासंबंधाने राज्य सरकारच्या किंवा राज्य सरकारने या कारणांसाठी अधिकार दिलेल्या कोणत्याही अंमलदाराच्या हुकूमाशिवाय किंवा त्यापासून मिळालेल्या अधिकाराशिवाय या कलमान्वये कोणतेही काम चालविता काम ा नये. हे महत्वाचे आहे. याकामी शासनाची पूर्व परवानगी मिळवून नंतरच चॅप्टर केस चालविणेत यावी.

**<u>कलम १०९</u>**

संशयित इसमाकडून चांगल्या वर्तणुकीबाबत तारणजेव्हा कोणत्याही कार्यकारी दंडाधिका-यास अशी खबर मिळेल की, अशा दंडाधिका-याच्या स्थानिक
अधिकार क्षेत्रात आपण असल्या (अस्तीत्वा) बद्दलची गोष्ट लपविण्याविषयी कोणी इसम पूर्वोपाय करीत आहे ते पूर्वोपाय काही कॉग्नीझेबल अपराध करण्याच्या हेतूने करीत आहे असे मानण्यास कारण असेल तेव्हा, एका वर्षापेक्षा जास्त नाही इतक्या मुदतीसाठी कार्यकारी दंडाधिकारी चांगली वर्तणूक ठेवण्याविषयी वैक्तिक व हमीदारासह मुचलका लिहून देण्याबाबत त्यास इसमास हुकूम का करु नये याचे कारण दाखविण्यास त्यास या
कायद्यात पुढे ठरविल्याप्रमाणे फर्माविण्याचा कार्यकारी दंडाधिकारी यांना अधिकार आहे.

**<u>टीपः</u>**
एखाद्या इसम संशयास्पद स्थितीत फिरतांना सापडला व त्याच्या जवळ विशिष्ट प्रकारचीगुन्ह्यात वापरण्यासारखी हत्यारे, कागदपत्रे होती अगर त्याचे जोडीदार हे गुन् हेगार होते, त्यास विचारले असता, उडवा उडवीची उत्तरे देतो अशा इसमाचे बाबतीत या कलमान्वये कार्यवाही करता येते.

**कलम ११०**

सराईत गुन्हेगाराकडून तारण ज्यावेळी कार्यकारी दंडाधिकारी यांना अशी ख बर मिळेल की, त्यांच्या स्थानिक अधिकार कक्षेत विविक्षित इसमास..

अ) जबरी चोरी करणची,घर फोडण्याची,चोरी करण्याची किंवा बनावट लेख करण्याची सवय आहे किंवा

ब) चोरीचा माल आहे हे माहित असून तो घेण्याची सवय असलेला किंवा

क) चोराचे संरक्षण करण्याची किंवा त्यास आसरा देण्याची, चोरीचा माल लपविण्याची, किंवा त्याची व्यवस्था

करण्याच्याकामी मदत करण्याची सवय आहे किंवा

ड) मनुष्य चोरुन नेण्याची, पळवून नेण्याची, जुलमाने घेण्याचा अपराध करण्याची ठकबाजी करण्याची, अपक्रिया करण्याची, नाण्यासंबंधी अपराध किंवा

ई) शांतता भंग होईल असा अपराध करण्याची किंव अपराध करण्याचर प्रयत्न करण्याच ी किंवा ते करण्यात सहाय्य करण्याची सवय आहे किंवा

फ) खाली नमूद केलेल्या अधिनियमातील कोणतेही एक किंवा अधिक अपराध करण्याची किंवा करण्याचा प्रयत्न किंवा सहाय्य करण्याची सवय आहे..

अ) औषधे व सौदर्य प्रसाधने अधिनियमांचा भंग

ब) विदेश विनियम अधिनियमांचा भंग

क) नोकर निर्वाह निधी अधिनियमांचा भंग

ड) अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियमांचा भंग

ई) आवश्यक जिन्नस अधिनियमांचा भंग

फ) भारताचा नागरिक अधिकार अधिनियमांचा भंग

ग) जकात अधिनियमांचा भंग

२ कोणताही अपराध जो कोणत्याही इतर अधिनियमान्वये साठेबाजी बद्दल किंवा नफेबाजीबद्दल किंवा अन्न अगर औषधाच्या भेसळीबद्दल किंवा भ्रष्टाचाराबद्दल शिक्षेस पात्र असेल असा किंवा..

ग) त्यास तारणाशिवाय मोकळे ठेवले असता त्यापासून लोकास धोका पोहोचण्याचा संभव आहे इतक्या साहसी व भयंकर वृत्तीचा तो आहे.

अशा वेळी ३ वर्षापेक्षा जास्त नाही अशा मुदतीसाठी चांगली वर्तणूक ठेवण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी त्याच्याकडून वैयक्तिक अगर हमीदारासह मुचलका लिहून देण्याबाबतत्या इसमास का हुकूम करु नये दाखविण्यास पुढे दाखविलेल्या रितीने फर्माविण्याचा सदरहू दंडाधिका-यास अधिकार आहे.

**टीपः**

१. या कलमान्वये सराईत गुन्हेगाराचे विरुध्द कार्यवाही होऊ शकते. यामध्ये सामनेवाल्याच्या लौकिक, त्याच्या सवयी, पूर्वी भोगलेल्या शिक्षा या गोष्टी चॅप्टर केसमध्ये निकाल देतांना विचारात घ्याव्यात.

२. तुरुगातून अखेरची शिक्षा भोगून आल्यावर केवळ पूर्व शिक्षेखेरिज ज्या इसमाविरुध्द दुसरा पुरावा नसल्यास त्यांचेविरुध्द कलम ११० प्रमाणे तजवीज करता येणार नाही.

**कलम १४५**

१. जेव्हा कोणत्याही कार्यककारी दंडाधिकारी यांची पोलीस अहवालावरुन किंवा अन्य तऱ्हेने खात्री होईल की, त्यांचे अधिकार कक्षेच्या स्थलसीमेत जमीन किंवा पाणी किंवा सीमा याबाबत शांतता भंग होण्यासारखा तंटा आहे, तेव्हा

दंडाधिकारी ठरवतील त्या तारखेस व वेळेस कोर्टात सदर हू तंटयात संबंध असणा-यास हजर (स्वतः किंवा वकीलामार्फत) होऊन तंट्याच्या विषयाच्या कब्याच्या गोष्टी

संबंधाने आपापल्या लेखी कैफियती द्याव्यात, असा हुकूम करण्याचा अधिकार आहे.

२. या कलमाखाली जमीन किंवा पाणी या संज्ञेत इमारती,बाजार, मासळी धरण्याच्या जाग ा, पिक किंवा जमिनीचे इतर उत्पन्न व भाडे किंवा नफा यांचा समावेश होतो.

३. सदरहू हुकूमाची प्रत दंडाधिकारी फर्माविल त्या इसमावर समन्साप्रमाणे बजाविली पाहिजे व दुसरी तंट्याच्या एखाद्या ठळक जागी लावून जाहीर केली पाहिजे.

४. यानंतर दंडाधिका-याने तंट्याच्या विषयाचा कब्जा असण्याच्या हक्कासंबधाने अशा पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराने सांगितलेल्या दाव्यांचे गुण दोष लक्षात न घेता याप्रमाणे केलेली निवेदने पाहून पक्षकाराचे म्हणणे ऐकून घेऊन व दिलेला पुरावा त सेच आवश्यक वाटल्यास आणखी पुरावा असल्यास घेऊन कोणत्या पक्षाचा कब्जा पोट कलम (१) अन्वये हुकूम करतांना होता हे ठरवावे.

परंतु दंडाधिका-याने मिळालेल्या पोलीस अहवालाच्या अगर अन्य माहिती तारख ेच्या लगतपूर्वी दोन महिन्यांत कोणत्याही पक्षाचा कब्जा जबरीने व अन्यायाने काढून घेतल्याचे निदर्शनास येईल किंवा वर निर्देश केलेल्या तारखे नंतर व पोटकलम (१) अन्वये केलेल्या हुकूमाच्या तारखेच्या पूर्वी कब्जा काढून घेतलेल्या पक्षाचा कब्जा पोट कलम (१) अन्वये केलेल्या हुकूमाच्या तारखेस होता असे मानावे.

५. कोणत्याही पक्षाने तंटा नाही किंवा नव्हाता असे दाखविल्यास दंडाधिका-याने त्याच ा हुकूम रद्द करावा व पुढील काम चालविणे स्थगित

करवे, नाहीतर तो हुकूम अखेरचा म्हणून समजण्यात येईल.

६. अ) ज्या पक्षाच्या कब्जात तंट्याचा विषय आहे असे आढळून आले आहे त्याच्या कब्जातूनतो कायदेशिर काम चालवून काढण्यात येई तो पर्यंत त्यास कोणी कोणत्या प्रकारे हरकत करु नये, असा हुकूम करता येईल व वरील पोट कलम (४) खालील परंतुकान्वये दंडाधिका-यास बळजबरीने व अन्यायाने मिहविलेला कब्जा काढून तो दुस-या पक्षास ठेवविण्याचा अधिकार आहे. ब) या पोट

कलमाखालील आदेश पोट कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रमाणे अनुसरुन राहील.

७. वारसा हक्कानुसार पक्षांतील इसमाच्या मरणानंतर देखील काम चालविता येईल.

८. तंट्याचा विषय असलेली मिळकत खराब होणारी किंवा नाशवंत पीक वगैरे असल्यास ती विकून व्यवस्था करण्याचा व योग्य वाटेल असा हुकूम करण्याचा दंडाधिकारी यांना अधिकार आहे.

९. कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरुन कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्याविषयी फर्माविणारे समन्स काढण्याचा अधिकार आहे.

१०. या कलमातील मजकूर कलम १०७ अन्वये काम चालविण्यास बाधक ठरणार नाही.

**टीपः**

या कलमान्वये क ार्यकारी दंडाधिकारी यांना उपाय योजना करण्यासाठी दोन गोष्टींच आवश्यकता आहे.

१. जो तंटा आहे त्यामुळे शांतता भंग होण्याचा संभव आहे.

२. सदरचा तंटा स्थावर मिळकतीबाबत आहे.

या कलमान्वये दंडाधिकारी यांना मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा कोणाचा आहे एवढेच पहावयाचे आहे. प्रत्यक्ष मालकी कोणाची वगैरे संबंधित हक्क ठरविण्याचा अधिकार नाही. एखाद्या पक्षाच्या कब जात एखादी मिळकत जरी अन्यायाने असली तरी या

कलमाच्या कारणासाठी ती जमीन त्याच्याच कब्जात आहे असे मानले पाहिजे. नोटीस मिळाल्यानंतर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देता येईल.